# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**विषय - अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा◌ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.७/६/२०२३ पर्यत झालेला खर्च | दि. ७/६/२०२३ पर्यंतची शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १ | स्मशानभुमी/कब्रस्थान विकास /गॅस दाहीनी बसविणे | रु. ५०.०० लक्ष | रु.१.९९ लक्ष | रु.४८.०१ लक्ष |
| | एकूण | रु. ५०.०० लक्ष | रु.१.९९ लक्ष | रु. ४८.०१ लक्ष |

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये स्मशानभुमी/कब्रस्थान विकास /गॅस दाहीनी बसविणे या लेखाशिर्षामध्ये निधी कमी दिलेला आहे. मात्र खालील विषयांकित काम करण्यासाठी दिनांक २१/०२/२०२३ रोजी मा.आयुक्त सा◌ो. यांनी मंजूरी दिलेली असून दि.०८/०३/२०२३ रोजी प्रशासकिय ठराव (क्रमांक ११४) पारीत करणेत आलेला आहे. सदरचे काम अत्यंत महत्वाचे व समाजाभिमुख आहे. मात्र स्मशानभुमी/कब्रस्थान विकास /गॅस दाहीनी बसविणे या लेखाशिर्षामध्ये तरतूद करणेकामी तरतूद अल्प आहे. विषयांकित प्रस्ताव रु.८५.०० लक्ष चा आहे. तरी खालील कामांकरीता वरील लेखाशिर्षामध्ये "आरक्षित जागांना कुंपन घालणे व भिंत बांधणे" या लेखाशिर्षामधुन रु.३८.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्र.०५ च्या कार्यक्षेत्रातील अजयनगर स्मशानभुमी येथे गॅस दाहीनी बसविणेबाबत. | रु. ८४.९८ लक्ष | |
| एकूण | रु. ८४.९८ लक्ष | |

| अ. क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२२-२३ करीता करणेत आलेली तरतूद | दि.७/६/२०२३ पर्यत झालेला खर्च | दि. ७/६/२०२३ पर्यंतची शिल्लक | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरक्षित जागांना कुंपन घालणे व भिंत बांधणे | रु. १००.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | रु. १००.०० लक्ष | रु.३८.०० लक्ष |
| | एकूण | रु. १००.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | रु. १००.०० लक्ष | रु.३८.०० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३,व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो. व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा़ो. यांच्याकडे निहीत आहेत.

स्मशानभुमी/कब्रस्थान विकास /गॅस दाहीनी बसविणे या लेखाशिर्षामध्ये "आरक्षित जागांना कुंपन घालणे व भिंत बांधणे" या लेखाशिर्षामधून रु.३८.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास मा.प्रशासक तथा आयुक्त सा़ो. यांनी दिनांक १२/०६/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** 298 **दिनांक** 30 **/०६/२०२३**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या भाग समिती क्र.०५ च्या कार्यक्षेत्रातील अजयनगर स्मशानभुमी येथे गॅस दाहीनी बसविणेबाबतच्या कामाकरीता प्रशासकिय व आर्थिक ठराव क्र.११४ दि.८/३/२०२३ नुसार मान्यता दिलेली असून विषयांकित कामास संबधित लेखाशिर्षामध्ये निधी अपुरा असल्याने आरक्षित जागांना कुंपन घालणे व भिंत बांधणे या लेखाशिर्षामधून स्मशानभुमी/कब्रस्थान विकास /गॅस दाहीनी बसविणे या लेखाशिर्षामध्ये मध्ये रु.३८.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
o/c **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**